किरकोळ फौ.अर्ज क्रं. १४९/२०१७
वंदना विरुध्द मधुसुदन
निशानी क्र. ३३.

<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्रमांक १ यांचा उलटतपास गैरअर्जदाराचे वकिल श्री. ए. एस. रेवतकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु -</u>

१४. हे म्हणणे खरे आहे की, मी व गैरअर्जदार क्र.१ एकाच गावात राहतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे व गैरअर्जदाराचे घर एकमेकांना लागून आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर माझ्या सासऱ्यांच्या जागेवर बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र.१ त्याच्या वयोवृध्द आईला घेऊन वेगळा राहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी अरोली पोलीस स्टेशनमध्ये होमगार्डचे काम करते. मी पूर्वी होमगार्ड म्हणून काम केलेले आहे परंतु तब्येत बिघडल्यानंतर मी ते काम सोडून दिले. हे म्हणणे खरे आहे की, पूर्वी गैरअर्जदार क्र.१ चा भाऊ संजय चव्हान हा नागपूरला राहत होता व त्यानंतर सन २०१६ मध्ये ते घोटमुंडरी येथे राहायला आले. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ नंतर संजय त्याच्या सासरवाडीत राहायला गेला.

१५. हे म्हणणे खरे आहे की, माझी मोठी मुलगी निकीता हिचा विवाह झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, निकीता आता माझ्याच घरी राहत आहे. मी गैरअर्जदार क्र.१ सोबत सन १९९८ ते सन २०१५-१६ पर्यंत संसार केला. साक्षीदार स्वत:हून सांगते की, गैरअर्जदार क्र.१ हा सहा वर्षे माथनी येथे एकटा राहीला. हे म्हणणे खरे आहे की, जेव्हा गैरअर्जदार क्र.१ माथनीला एकटा राहत होता तेव्हा तो एका खाजगी कंपनीमध्ये काम करीत होता व तेव्हा ती कंपनी चालू होती. हे म्हणणे खरे आहे की, कंपनी बंद झाल्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा गावी घोटमुंडरी येथे राहायला आला होता.

१६. मी सन २०१६ च्या पूर्वी गैरअर्जदार क्र.१ च्या विरूध्द कुठल्याही पो.स्टे.ला तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र.१ जेव्हा घोटमुंडरी येथे राहायला आला त्यानंतर मी त्याचेविरूध्द तक्रार केली. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र.१ ला दारूचे व्यसन नाही. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा त्याच्या आई-वडीलांना मदत करत असे.

<u>गैरअर्जदार क्र.१ चे विद्वान वकील श्री. ए. एस. रेवतकर यांच्या मौखिक विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब</u>.

श्रवणोत्तर स्वीकृत
मौदा.
दिनांक २३.०३.२०२६

समक्ष
Sd/-
**(एन. के. वानखडे)**
सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
मौदा.